मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिखली येथील इंद्रायणी नदी पात्रातील 36 अनधिकृत बांधकामे भुईसपाट

## सुमारे 63,970 चौरस फूट क्षेत्रफळ असलेली 36 अनधिकृत बांधकामे निष्कासित : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील गट क्रमांक ९० मधील इंद्रायणी नदीलगतच्या निळ्या पूररेषेतील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या ७ हजार २४५ चौरस मीटर भूभागावरील सुमारे ६३,९७० चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ३६ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.



शहराच्या बाजूने जाणाऱ्या इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेमध्ये अनधिकृत पद्धतीने बांधण्यात आलेल्या बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्याचा निर्णय हरित लवादने दिला होता. शिवाय हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या चिखलीमधील या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर यांच्या अधिपत्याखाली सहशहर अभियंता संजय खाबडे, नितीन देशमुख, उपआयुक्त राजेश आगळे,सीताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अमित पंडित, श्रीकांत कोळप, किशोर ननवरे, शीतल वाकडे, पूजा दुधनाळे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, महेश वाघमोडे, नाना मोरे, कार्यकारी अभियंता सुर्यकांत मोहिते, सुनील भागवानी, विजय सोनवणे, लक्ष्मीकांत कोल्हे, विजय वायकर, शिवराज वाडकर, सुनीलदत्त नरोटे यांच्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त डॉ. शिवाजी पवार, बापूसाहेब बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल कोळी, राजेंद्रसिंह गौर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आयुक्त सिंह यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली तसेच कारवाईचा आढावा घेतला. सकाळी सहानंतर कारवाईला सुरुवात झाली. दुपारी साडेतीन वाजेला संपलेल्या या कारवाईमध्ये ३६ इमारतवजा बंगले निष्कासित करण्यात आले आहेत.

मौजे चिखली येथील स.नं ९० पै. मधील इंद्रायणी नदी लगतच्या निळया पुररेषेतील उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत याचिकाकर्त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर यांच्याविरुद्ध राष्ट्रीय हरीत लवाद पुणे यांच्याकडे दावा दाखल केला होता.

### निष्कानाच्या कारवाईमध्ये सहभागी यंत्रणा

» अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ७ कार्यकारी अभियंते, २२ उपअभियंते, २२ कनिष्ठ अभियंते, २२ बीट निरीक्षक, १६८ महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, ४०० पोलीस आणि १२० मजूर कर्मचारी या कारवाईमध्ये सहभागी झाले होते. १५ पोकलेन, ३ जेसीबी यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय २ अग्निशमन वाहने आणि ४ रुग्णवाहिका याठिकाणी तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील या कारवाईमध्ये सहभागी झाले होते.

“ चिखली गट नंबर ९० मध्ये निळ्या पूररेषेत असलेल्या अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. नागरिकांनी पिंपरी चिंचवड शहरात घर, बंगला, जमीन खरेदी करताना अशा मालमत्तांच्या सर्व शासकीय परवानग्या तसेच आरक्षणे अथवा पुररेषेसारख्या तत्सम बाबी तपासून घेणे आवश्यक आहे. कोणीही अनधिकृतपणे बांधकाम करू नये. यापुढेही शहरातील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेच्या वतीने कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# सकल मातंग समाजाचे 20 मे रोजी मुंबईत आक्रोश महाआंदोलन

## अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण लागू करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

अनुसूचित जातींमधील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने “आक्रोश महाआंदोलन” आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन २० मे २०२५ रोजी, मुंबईच्या आझाद मैदानात दुपारी १ वाजता होणार आहे.



या आंदोलनाचा मुख्य उद्देश म्हणजे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून ते येत्या जून २०२५ पासून लागू करवे. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमधील दुर्लक्षित घटकांना शैक्षणिक संधी, शासकीय नोकरी व योजनांचा थेट लाभ मिळू शकेल. तरी “राज्य शासनाच्या विविध योजनांपासून आणि आरक्षणाच्या थेट लाभापासून अनेक लहान लहान उपगट वंचित राहत आहेत. त्यामुळे हक्काचे आरक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी उपवर्गीकरण अत्यावश्यक झाले आहे अशी समाजाची मागणी आहे.

या आंदोलनात सर्व पक्षीय अनेक मान्यवर नेते व लोकप्रतिनिधी सहभागी होणार असून, उपस्थिती लावणाऱ्यांमध्ये खालील प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे:

विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे,आमदार जितेश अंतापूरकर, माजी आमदार मधुकरराव घाटे, माजी आमदार नामदेव जयराम ससाणे, माजी मंत्री रमेश बागवे, माजी मंत्री दिलीप कांबळे, आण्णाभाऊ साठेंचे नातू सचिन साठे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, याशिवाय पंडित सूर्यवंशी ,मारुती वाडेकर, अशोक लोखंडे, राम चव्हाण यांसारखे अनेक नेते आंदोलनात सहभागी होणार आहेत.

सरकारने लवकरात लवकर आरक्षणाचे उपवर्गीकरण करून न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन अजून तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे येणाऱ्या मंगळवारी आझाद मैदानावर आयोजित केलेल्या आंदोलन सहभागी होण्याचे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी सर्व समाज बांधवाना केले आहे.

# पुण्यासाठी भाजपचा 'मास्टर प्लॅन' तयार

## पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने जय्यत तयारी सुरु केली आहे

पुणे | प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर महापालिका निवडणुकीसाठी किती प्रभाग असणार, याबाबत पुण्यात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशातच, भाजपचा मास्टर प्लॅन समोर आला आहे.

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने जय्यत तयारी सुरु केली आहे. लोकसभेचीच रणनीती महापालिका निवडणुकीत वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पक्षाचे जुने, अनुभवी आणि माजी नगरसेवक असलेले अनेक यंदाच्या निवडणुकीत डावलले जाण्याची शक्यता आहे.

महापालिका निवडणुकीसाठी भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इच्छुकांची भाऊगर्दी असल्याचे पाहायला मिळत आहे. एका उमेदवारीसाठी चार ते पाच इच्छुक प्रत्येक ठिकाणी आहेत. त्यामुळे या इच्छुकांमधून योग्य उमेदवार निवडण्यासाठी भाजपकडून विविध पातळ्यांवर सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. हे सर्वेक्षण करण्यासाठी संस्थेची देखील नेमणूक करण्यात आली आहे.

महापालिकेच्या निवडणुका येत्या चार-पाच महिन्यात होणार आहे. त्यासाठी सर्वच पक्षांनी तयारी सुरु केली आहे. आगामी निवडणुका या महाविकास आघाडी आणि महायुती म्हणून लढल्या जाणार की स्वबळाचा याचा ठोस निर्णय अद्याप झालेला नाही. पण कार्यकर्ते, पदाधिकारी कामाला लागले आहेत.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुणे दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान, भाजपचे अध्यक्ष धीरज घाटे यांनी पदाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना कामाला लागा, अशा सूचना दिली आहे. महानगरपालिका निवडणुकांची पार्टीने जोरात तयार केली पाहिजे, आपला महापौर महापालिकेत बसला पाहिजे अशा पद्धतीने कामाला लागा असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर, "आमचे 105 नगरसेवक आहेत त्या जागा पुन्हा निवडून येणे हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. कोण किती जागा लढवणार याचा फॉर्म्युला प्रदेश स्तरावर ठरणार आहे. 2017 मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत ज्या जागा आम्ही निवडून आलोय त्या सगळ्या लढवणार आहोत, अस घाटे यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं होते.

पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकांमध्ये स्वबळावरच निवडणुका लढवाव्या लागतील, असे दिसते. 2017 च्या महापालिका निवडणुकीत 164 पैकी 99 जागा भाजपने जिंकल्या होत्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसने 42 जागा जिंकून दुसऱ्या क्रमाकाचा पक्ष होता.



### स्वबळावर लढण्याचा नारा?

» स्वबळावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढाव्यात, अशी मागणी भाजपच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पुण्यात फॉर्म्युला देखील सांगितला. सरसकट युती न करता ज्या ठिकाणी स्वाभाविक युती होऊ शकते त्या ठिकाणी युती करण्यात येणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले आहे.

### उमेदवारी मिळवण्यासाठी खडतर वाट

» मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्वेक्षण तीन स्तरावर करण्यात येणार आहे. केंद्रीय, प्रदेश पातळी आणि संघटनात्मक. त्यामुळं उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांना मोठ्या आव्हानांना सामोरं जाव लागणार आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने उमेदवारी निश्चित करण्यासाठी अशाच प्रकारची रणनीती आखण्यात आली होती. आता हाच फॉर्म्युला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीदेखील वापरण्यात येणार आहे

### नव्या चेहऱ्यांना मिळणार संधी

» आगामी निडणुकीत भाजपमध्ये अंतर्गत धुसफुस आणि नाराजी उफाळून येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण भाजप नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवण्यात आली आहे. त्यामुळं जुन्या अनुभवी नेत्यांसाठी भाजपची रणनीती डोकेदुखी ठरणार.

# वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या चालक –वाहक सेवकांना दंडात्मक कारवाईसह निलंबन कारवाईचा इशारा

## वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास आता थेट निलंबनाची कारवाई

पुणे | प्रतिनिधी

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडुन (पीएमपी) पुणे व पिंपरी-चिंचवड शहर, शहरांलगतची उपनगरे आणि पी.एम.आर.डी.ए. हद्दीत बससेवा पुरविली जाते. दैनंदिन संचलनात असलेल्या बसेसमध्ये पीएमपीच्या स्वमालकीच्या व खाजगी बस पुरवठादारांच्या बसेसचा समावेश आहे. या बस चालक आणि वाहकांकडून वाहतुकीचे नियम पाळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे आता दंडात्मक कारवाईसह निलंबनाची कारवाईचा इशारा पीएमपी प्रशासनाने दिल्या आहे.

पीएमपीच्या स्वमालकीच्या व खाजगी बस पुरवठादारांच्या बसेसवरील चालक-वाहक सेवक हे वाहतुकीच्या नियमांचे पालन करीत नसल्याबाबत प्रवाशी नागरिक, सजग नागरिक मंच, पीएमपीएमएल प्रवाशी मंच तसेच सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांच्याकडुन तक्रारी व सुचना प्राप्त होत असतात. या तक्रारी व सूचनांमध्ये प्रामुख्याने बस चालविताना मोबाईलवर बोलणे, झेब्रा क्रॉसिंगवर बस थांबविणे, धुम्रपान करणे, रूट बोर्ड न बदलणे, लेनच्या शिस्तीचे पालन न करणे, सिग्नल तोडणे आदी तक्रारींचा समावेश आहे.

पीएमपी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार महामंडळाकडील व खाजगी बस पुरवठादारांकडील चालक-वाहक सेवकांच्या गैरवर्तनाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण होणाऱ्या दृष्टीने पीएमपी प्रशासनाने परिपत्रकाद्वारे चालक-वाहकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. सूचनांचे पालन न केल्यास चालक-वाहक सेवकांवर २००० रूपये इतकी दंडात्मक कारवाई अथवा निलंबनाची कारवाई करण्यात येईल. असे नमूद करण्यात आले आहे.



### या परिपत्रकात दिलेल्या सूचना ..

» बस चालविताना चालकाने मोबाईलवर बोलू नये.
» वाहतुकीच्या नियमांचे पालन करून बस चालविणे.
» चालक-वाहक सेवकाने कोणत्याही प्रकारचे धुम्रपान करू नये.
» प्रवाशांना चढ-उतार करणे सुलभ होईल अशा रीतीने बस बसथांब्यालगत उभी करणे.
» लेनच्या शिस्तीचे पालन करणे.
» भरधाव वेगाने बस चालवू नये.

# आमच्यासोबतच दुजाभाव कशासाठी?

## टीपी स्कीमबाबत चऱ्होलीकरांचा पालिका प्रशासनाला संतप्त सवाल; चिखली-कुदळवाडीप्रमाणेच ही योजना रद्द करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिकांच्या तीव्र विरोधामुळे चिखली-कुदळवाडी येथील टीपी स्कीम रद्द करण्याचा निर्णय पिंपरी-चिंचवड महापालिकेने घेतला असतानाच चऱ्होली येथील टीपी स्कीम मात्र नागरिकांच्या विरोधानंतरही कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे चिडलेल्या ग्रामस्थांनी "आमच्यासोबतच दुजाभाव कशासाठी," असा सवाल महापालिका प्रशासनाला केला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली-कुदळवाडी आणि चऱ्होलीसह मोशी गावातील काही भागात प्रस्तावित टीपी स्कीम राबवण्याचा निर्णय घेतला होता. त्याला तिन्ही गावांतील ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप घेत काही झाले, तरी आम्ही ही योजना होऊन देणार नाही, असा पवित्रा घेतला होता. त्यापैकी चिखली, कुदळवाडी येथील ही योजना रद्द करण्याचा निर्णय महापालिका सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. मात्र, दुसरीकडे सर्वात जास्त जागा बाधित होणाऱ्या चऱ्होलीतील प्रस्तावित टीपी स्किम रद्द न केल्याने चऱ्होली ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. महापालिका प्रशासन आमच्या बाबतच असा दुजाभाव का करत आहे, असा सवाल चऱ्होलीच्या ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

महापालिकेच्या वतीने चिखली-कुदळवाडी येथील ३८० हेक्टर, तर चऱ्होली येथे पाच ठिकाणी १,४२५ हेक्टरवर टीपी स्कीम प्रस्तावित करण्यात आल्याचे जाहिरातीद्वारे प्रकटन केले होते. याबाबत नागरिकांना आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता योजना राबवल्याचा आरोप करीत चिखली, चऱ्होली आणि मोशी ग्रामस्थांनी महापालिका प्रशासनाचा निषेध केला होता. चिखलीतील ग्रामस्थांनी महापालिका प्रशासनाने त्या जाहिरातीची सार्वजनिक ठिकाणी एकत्रित जमून होळी केली होती. त्यानंतर झालेल्या बैठकीत श्री भैरवनाथ बचाव कृती समितीची स्थापना करून या परिसरातील स्थानिक ग्रामस्थ, विविध व्यवसाय निमित्त आलेले उद्योजक, कामगार यांनी एकजुटीने महापालिकेच्या टीपी स्कीमला विरोध केला.

चऱ्होली भागात सर्वाधिक म्हणजे १,४२५ हेक्टर जमिनीवर टीपी स्कीम टाकण्याचा प्रस्ताव पिंपरी-चिंचवड महापालिकेने मांडला आहे. त्याच्या विरोधात ही ग्रामस्थांनी एक इंचही जागा देणार नाही, असा निर्धार बैठकीत व्यक्त केला आहे. योजनेत आमच्या जमिनी आरक्षित करण्यात आल्या आहेत. टीपी स्कीम आल्यावर वर्षभर बांधकाम परवानगी बंद करण्याचा निर्णय महापालिका घेणार आहे. त्यामुळे चऱ्होलीमधे जो विकास सुरू होणार आहे त्याला खीळ बसणार आहे



### एक इंचही जागा देणार नाही; ग्रामस्थांचा निर्धार

» चऱ्होली भागात सर्वाधिक म्हणजे १,४२५ हेक्टर जमिनीवर टीपी स्कीम टाकण्याचा प्रस्ताव पिंपरी-चिंचवड महापालिकेने मांडला आहे. त्याच्या विरोधात ही ग्रामस्थांनी एक इंचही जागा देणार नाही, असा निर्धार बैठकीत व्यक्त केला आहे. योजनेत आमच्या जमिनी आरक्षित करण्यात आल्या आहेत. टीपी स्कीम आल्यावर वर्षभर बांधकाम परवानगी बंद करण्याचा निर्णय महापालिका घेणार आहे. त्यामुळे चऱ्होलीमधे जो विकास सुरू होणार आहे त्याला खीळ बसणार आहे. तसेच योजना मंजूर झाल्यावर नागरिक भूमिहीन होण्याचा धोका वाढत असल्याने चऱ्होलीकरांनी या प्रस्तावित टीपी स्कीमच्या विरोधात जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

> चिखली-कुदळवाडी येथील टीपी स्कीम रद्द करण्यात आली. मग चऱ्होलीत स्कीम राबवण्याचा अट्टाहास कशासाठी? महापालिका प्रशासनाने इथे योजना का रद्द केली नाही? आमच्याबाबतच दुटप्पी भूमिका का, प्रशासनाने जाहीरपणे सांगावे. आम्ही हे आंदोलन सुरूच ठेवणार आहोत.
>
> - कुणाल तापकीर

> आमच्या गावाने तुमचे काय घोडे मारले आहे? १,४२५ हेक्टर जमीन ताब्यात घेणे हा आम्हा गावकऱ्यांना भूमिहीन करण्याचा प्रशासनाचा डाव आहे. लोकप्रतिनिधींनी चिखलीची टीपी स्कीम रद्द करण्याची मागणी केली होती. आता ती स्कीम रद्द झाल्याचे सांगण्यात आले आहे. या लोकप्रतिनिधींनी आता चऱ्होलीसाठी प्रयत्न करायला हवे आहेत. जर प्रशासनाने ही स्कीम रद्द केली नाही तर आम्ही जनआंदोलन सुरूच ठेवणार आहोत.
>
> - मंगेश माटे, शेतकरी, चऱ्होली

# पालिकेच्या 8 जागांवर मेट्रोची मालकी; भाडे तत्त्वाऐवजी थेट बिनशर्त मालकी हक्क

## मेट्रो मार्गिकेसाठी महापालिकेने आठ जागा महामेट्रोला 30 वर्ष भाडे तत्त्वावर दिल्या आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील मोक्याच्या ठिकाणच्या आठ जागा 30 वर्षे भाडेतत्त्वावर महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला (महामेट्रो) दिल्या आहेत. आता त्या कोट्यवधी रुपये किमतीच्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी (फ—ी होल्ड) हक्काने देण्याचा आदेश राज्य शासनाने महापालिकेस दिला आहे. त्यामुळे त्या आठ जागेचा मालक आता महामेट्रो असणार आहे. त्या ठिकाणी व्यापारी संकुल बांधून महामेट्रोच्या तिजोरीत भरघोस उत्पन्न जमा होणार आहे.

शहरात पहिल्या टप्प्यात पिंपरी ते दापोडी अशी मेट्रो धावत आहे. या मेट्रो मार्गिकेसाठी महापालिकेने आठ जागा महामेट्रोला 30 वर्ष भाडे तत्त्वावर दिल्या आहेत. त्या ठिकाणी पार्किंग विकसित करण्याची, व्यावसायिक उपयोग न करण्याची अट महापालिकेने घातली होती. तीस वर्षांचे एकूण भाडे रक्कम महापालिकेचा हिस्सा म्हणून महामेट्रोकडे समायोजित करण्यात आली आहे.

महामेट्रोने प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेतले आहे. कर्जाची नियमित परतफेड तसेच, मेट्रो संचलन, दुरुस्ती व देखभालीचा खर्च भागविण्यासाठी महापालकिच्या त्या जागांचा व्यावसयिक कारणांसाठी वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या जागा महामेट्रोला बिनशर्त मालकी हक्काने मिळाव्यात, अशी विनंती महामेट्रोने राज्य शासनाकडे केली होती.




### आणखी पंधरा जागा महामेट्रोकडे ?

» पिंपरी ते निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत मेट्रो मार्ग विस्ताराचे काम सुरू आहे. त्या मार्गिका तसेच, स्टेशनसाठी महामेट्रोला महापालिकेने 11 जागा 30 वर्षे भाडे तत्त्वावर देण्यात आल्या आहेत. त्याचे एकूण क्षेत्रफळ 4,883.233 चौरस मीटर इतके आहे. त्या जागा भाडे तत्त्वाऐवजी बिनशर्त मालकी हक्काने देण्याची मागणी महामेट्रोने केली आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार त्या जागाही महामेट्रोच्या मालकी होण्याची दाट शक्यता आहे.

### सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर कार्यवाही

» राज्य शासनाचा आदेश प्राप्त झाला आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्तांसमोर ठेवण्यात येणार आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर महापालिकेचा आठ जागांचा मालकी हक्क महामेट्रो मिळेल, असे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

# नागरी हवाई वाहतूक उद्योग व विकासासाठी मुख्यमंत्र्यांना प्रस्ताव सादर

## विकासाला चालना देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीची रुपरेषा दिली आहे, अशी माहिती हवाई वाहतूक तज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

भारताच्या नागरी हवाई वाहतूक क्षेत्राची अभूतपूर्व वाढ होत असल्याने आज महाराष्ट्र एका मोठ्या परिवर्तनीय संधीच्या उंबरठ्यावर उभा आहे. या संधीचा जास्तीत जास्त लाभ महाराष्ट्रास मिळावा, यासाठी दिनांक 18 मार्च 2025 रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काही प्रस्ताव सादर केले आहेत. यात राज्याच्या नागरी हवाई वाहतूक क्षेत्राच्या शाश्वत वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीची रूपरेषा दिली आहे. अशी माहिती हवाई वाहतूक तज्ञ धैर्यशील वंडेकर यांनी दिली.

वंडेकर म्हणाले, मुख्यमंत्री कार्यालयाने मला कळवले आहे की, माझे प्रस्ताव मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडे पाठवण्यात आले आहेत व त्यांनी ते पुढील कार्यवाहीसाठी अतिरिक्त मुख्य सचिव (वाहतूक) संजय सेठी यांच्याकडे पाठविले आहेत. मला विश्वास आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रगतिशील नेतृत्वाखाली, या प्रस्तावांवर लवकरच सकारात्मक कार्यवाही केली जाईल. देशात हवाई वाहतूक क्षेत्रात निर्माण झालेल्या या संधीचा फायदा घेऊन महाराष्ट्र आपल्या आर्थिक विकासास चालना देण्याबरोबरच तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करू शकेल.

विमानतळांमध्ये हवाई वाहतुकीसाठी मोठी क्षमता आहे. गरज आहे ती हि विमानतळ आधुनिक, अद्यावत, जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधांनी युक्त, दर्जेदार व स्पर्धात्मक करण्याची ज्यामुळे येथून शाश्वत हवाई वाहतूक सुनिश्चित होईल. यातील अनेक विमानतळ बऱ्याच वर्षांपासून विना वापर वा अल्प वापरली जात आहेत. ही विमानतळ लवकरात लवकर कार्यान्वित झाल्यास याचा राज्याच्या अर्थव्यवस्थेस व जनतेस मोठा उपयोग होईल. हे जलद होण्यासाठी सरकारने अश्या विमानतळांचा सार्वजनिक-खासगी भागीदारीतून चालवण्याचा विचार करावयास हवा.

विमानतळावर धावपट्टी विस्तारासाठी प्रलंबित जमीन अधिग्रहण प्राधान्याने करण्यात यावे. हवाई मार्गाने जोडले गेल्यास या प्रदेशाच्या आर्थिक क्षमतेस मोठा वाव मिळेल व या भागातील पर्यटन, व्यापार, उद्योग, कृषी क्षेत्रास मोठी चालना मिळेल.




### व्यापक नागरी विमान वाहतुक धोरण

» देशाच्या व्हिजन 2040 शी सुसंगत असे भविष्यकालीन आणि व्यापक राज्य नागरी हवाई वाहतूक धोरण तयार करणे. ज्या मध्ये राज्याचा या क्षेत्रासाठीचा दृष्टिकोन, ध्येय आणि उद्दिष्टे मांडली जातील. असे धोरण ही काळाची गरज आहे व यामुळे महाराष्ट्राच्या नागरी हवाई वाहतूक क्षेत्रासाठी एक योग्य रोडमॅप तयार होईल.. याने या क्षेत्राच्या विकासाला चालना देताना शाश्वतता सुनिश्चित होईल, तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अनुकूल व्यवसाय वातावरण निर्माण होईल.

### हवाई वाहतूक विभागासाठी स्वतंत्र वेबसाइट

» महाराष्ट्राच्या नागरी हवाई वाहतूक विभागासाठी एक समर्पित वेबसाइट असणे गरजेचे आहे. या मुळे कामकाजातील पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल. या वेबसाइटवर राज्यातील सर्व विमानतळ, लैंडिंग ग्राउंड, वॉटरड्रॉम्स, हेलिपोर्ट, विमान वाहतूक सुविधा, सेवा, प्रक्रिया, एमआरओ, एफटीओ इत्यादींची माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. याची माहिती जगभरातून कोणीही एका क्लिक वर प्राप्त करू शकेल. यामुळे महाराष्ट्रात या उद्योगास चालना मिळेल.

### आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरु करा

» ओझर व छत्रपती संभाजीनगर विमानतळांवर आंतरराष्ट्रीय प्रवासी उड्डाणे हाताळण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा बऱ्याच काळा पासून उपलब्ध असल्या तरी या विमानतळांवरून अद्याप आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू झालेली नाहीत. व्यापार, उद्योग, पर्यटन क्षेत्रांकडून अनेक वर्षांपासून होत असलेल्या या मागणीची पूर्तता होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घ्यावा. या बरोबरच शिर्डी विमानतळावरून आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरु करण्याची देखील मोठी मागणी आहे. या मागणीचा व भविष्यातील शिर्डी विमानतळाची मोठी क्षमता पाहता, एमएडीसीला या विमानतळावर आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करून संबंधित खात्याच्या परवानग्या मिळवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सूचना द्यावयास हव्यात.

---

# इंदापूरच्या काटी गावात सरपंच विपुल वाघमोडेंचा स्वच्छता मोहीमेला प्रारंभ

## इंदापूर तालुक्यातील काटी गावाचे नवनिर्वाचित सरपंच विपुल वाघमोडे यांनी गाव स्वच्छ आणि सुंदर करण्याचा संकल्प

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील काटी गावाचे नवनिर्वाचित सरपंच विपुल वाघमोडे यांनी गाव स्वच्छ आणि सुंदर करण्याचा संकल्प सोडला आहे. स्वच्छतेच्या मोहिमेत स्वतः पुढाकार घेत त्यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने गाव चकाचक करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे गावकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

सरपंच विपुल वाघमोडे यांनी माहिती देताना सांगितले की, “स्वच्छ गाव, सुंदर गाव हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गावातील प्रत्येक कुटुंबाला छोट्या आणि मोठ्या आकाराच्या दोन कचरा कुंड्या मोफत दिल्या जाणार आहेत. यापुढे गावकऱ्यांनी कचरा रस्त्यावर किंवा अस्ताव्यस्त न टाकता कचरा कुंड्यांमध्येच टाकावा,” अशी विनंती त्यांनी केली.

या प्रसंगी उपसरपंच उमा यादव, ग्रामसेवक संतोष मोहिते, ग्रामपंचायत कर्मचारी, सदस्य आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच वाघमोडे यांच्या या पुढाकारामुळे काटी गाव स्वच्छतेच्या दिशेने नवा टप्पा गाठण्यास सज्ज झाले आहे. गावातील स्वच्छता अभियान जोमाने सुरू असून, यात गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन गाव सुंदर बनवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच वाघमोडे यांनी केले



### स्वच्छता अभियानात सहभागाचे आवाहन

» गावातील स्वच्छता अभियान जोमाने सुरू असून, यात गावकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन गाव सुंदर बनवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच वाघमोडे यांनी केले. काटी ग्रामपंचायतीच्यावतीनेही गावकऱ्यांना या अभियानात सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

### पाणीपुरवठा पूर्ववत

» गावातील पाणीपुरवठ्याबाबत बोलताना वाघमोडे म्हणाले, “मागील दोन-तीन दिवसांपासून पाणीपुरवठ्याबाबत गावकऱ्यांना त्रास सहन करावा लागला, याबद्दल मी क्षमा मागतो. ग्रामपंचायत कर्मचारी आणि गावातील तरुणांच्या अथक प्रयत्नांमुळे पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत झाली आहे. आता सर्वांना मुबलक पाणी मिळेल.”